# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**निविदा किंमतः रूपये १०००/-**

**१६ पानी उत्तरपत्रिका कागदासहीत छपाई व बांधणी**

**निविदा पत्र (टेंडर फॉर्म) सन २०१४-२०१५ आर्थिक वर्षासाठी**

**मा. कुलसचिव,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे-४११००७.
यांसी...

१. जाहिरात क्र. आणि तारीख :

२. पुरवठादाराचे नाव :

३. पुरवठादाराचा संपूर्ण पत्ता :

४. दूरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक :

५. आयकर (पॅन) आणि व्हॅट क्र.

६. प्रति महिना उत्तरपत्रिका पुरवठ्याची क्षमता :

७. निविदा सूचना संदर्भातील सर्व सूचना व अटी :
मान्य आहेत का?

८. प्रति एक लाख :
उत्तरपत्रिकांचा दर (सर्व करांसहीत)
रुपये अंकात व अक्षरी -

**१६ पानी कागदासहीत उत्तरपत्रिका छपाईसंबंधीची माहिती खालीलप्रमाणे :**

| **कामाचे नाव** | **कामाचे विवरण** |
|---|---|
| १६ पानी कागदासहीत उत्तरपत्रिका छपाई व बांधणी<br>Paper Size : 23" x 36"<br>Answer book Size : 8.5"x 11.25" | प्रत्येक सीरिजसाठी १६ पानांची कागदासहीत प्रोसेस ब्लॅक कलर मध्ये छपाई, फोल्डींग, पिनिंग, होल पंचिंग, प्रत्येकी २०० प्रमाणे गठ्ठे बनविणे व पट्टी पॅकींग करणे, विद्यापीठ गोदाम कक्षात पोहोचविणे. |

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## अल्पकालीन निविदा सूचना

**सूचना अटी :**

१. निविदा सीलबंद पाकिटातून दि. १६ ऑक्टोबर, २०१४ रोजी दुपारी ३.०० किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत **मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७** (पाकिट क्र.१) यांच्या नावाने गोदाम कक्ष, परीक्षा विभाग, गणेशखिंड, पुणे–७ यांच्याकडे पोहोचतील अशा बेताने पाठवावी. तसेच सदर निविदा त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील.

२. १६ पानी कागदासहीत उत्तरपत्रिका छपाई व बांधणी निविदा असा स्पष्ट उल्लेख पाकिट क्र.१ वर करावा.

३. उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

४. निविदा देताना सर्व करांसहित किंमत दिलेली असावी व करांची स्वतंत्र विभागणी असावी.

५. उत्तरपत्रिकांसाठी क्रिमव्होन व्हाईट प्रिंटींग पेपर, ६० जीएसएम, १६ कि.ग्रॅ. रिम, २३''X ३६'' इंच मध्ये वापरावा.

६. निविदा पाठविताना अशा प्रकारचे छपाई केलेल्या कामाचा नमुने पाकिट क्र.१ मध्ये असणे आवश्यक आहे.

७. निविदा मान्य करताना फक्त दराचाच विचार केला जाणार नसून मालाच्या दर्जाचा, पुरवठादाराच्या सेवासंहितेचा व पुरवठा क्षमतेचा विचार केला जाईल.

८. नमुन्याप्रमाणे व नमूद केलेल्या ठराविक सूचनेप्रमाणे असणाराच माल स्वीकारला जाईल. नमुन्यानुसार माल नसल्यास अशा पुरवठादाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील व अशा पुरवठादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

९. तयार उत्तरपत्रिकांचा पुरवठा विद्यापीठ कार्यालयात स्वखर्चाने करावा लागेल.

१०. ऑर्डरमधील सर्व मालाची तात्काळ गरज नसल्यास मालाचे पुरवठा वेळापत्रक, खरेदी मागणीपत्रकामध्ये अंतभूर्त केले जाईल.

११. मान्य झालेल्या दरात कोणत्याही कारणास्तव कोणताही बदल अगर दरात वाढ करून मिळणार नाही.

१२. खरेदी मागणीपत्रामधील संपूर्ण तपशिलाप्रमाणे पूर्ण पुरवठा होईपर्यंत ठेकेदारांना अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

१३. काही कारणाने पुरवठादाराने पुरवठ्याच्या मुदतीत माल पुरविण्याचे नाकारले तर संबंधित मालाची विद्यापीठ खुल्या बाजारातून खरेदी करील आणि त्यापोटी विद्यापीठाचे झालेले नुकसान ठेकेदाराकडून वसूल केले जाईल.

१४. ज्या ठेकेदारांना वरील अटी मान्य असतील त्यांना वरील अटी मान्य असल्याचे लेखी निवेदन रू.१००/– च्या कोर्ट स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

१५. ऑर्डर प्रमाणे माल मिळाल्यापासून अंदाजे ३० दिवसांपर्यंत मालाची किंमत धनादेशाने अदा केली जाईल.

१६. निविदाप्राप्तीच्या अंतिम तारखेपासून लवकरात लवकर उत्तरपत्रिका छपाई व बांधणीचे कॉन्ट्रॅक्ट कोणाला द्यायचे यासंबंधी निर्णय होऊन तो संबंधितांना कळविण्यात येईल. तसेच या निर्णयाबद्दल माहितीही विद्यापीठाच्या संबंधित कार्यालयात मिळू शकेल.

१७. **मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** या नावे रू. १,००,०००/– अनामत रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टने निविदेबरोबर जोडणे आवश्यक आहे. (पाकिट क्र.२) अनामत रकमे शिवाय असलेली निविदा रद्द समजण्यात येईल तसेच ही रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर बिनव्याजी परत करण्यात येईल.

१८. उत्तरपत्रिका छपाई व बांधणी अनामत रक्कम असा उल्लेख पाकिट क्र. २ वर करावा.

१९. पुरवठाराने मालाची ऑर्डरमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत उत्तरपत्रिकांचा पुरवठा करणे आवश्यक आहे. मिळाल्यापासून कागद पुरवठा केल्यापासून जास्तीतजास्त १५ दिवसांच्या आत पुरवठा केलेल्या कागदाच्या प्रमाणात छपाई केलेला माल पुरविला पाहिजे.

२०. पुरवठादाराकडे उपलब्ध असलेल्या मशिनरीची यादी जोडावी.

२१. मागील दोन वर्षाचा आयकर परतावा भरलेल्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

२२. कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### कागदासहीत उत्तरपत्रिका तयार करण्यासाठी अल्पकालीन निविदा सूचना

विद्यापीठाच्या सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाच्या परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपत्रिका तयार करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचे विवरण खालीलप्रमाणे :

१) १६ पानी उत्तरपत्रिका मुखपृष्ठासह : २५ लाख

२) उत्तरपत्रिकेचा आकार ८.५" x ११.२५" राहिल.

३) उत्तरपत्रिकांसाठी क्रिमव्होन व्हाईट प्रिंटींग पेपर, ६० जीएसएम, १६ कि.ग्रॅ. रिम, २३" x ३६" इंच मध्ये वापरावा.

४) प्रति लाख उत्तरपत्रिकेचा दर नमूद करावा. (सर्व करांसहित)

५) कामाची प्रक्रिया : संपूर्ण ऑफसेट छपाई, पिनींग, पंचिंग, पॅकिंग व पोहोच.

या संबंधीची संपूर्ण माहिती उपकुलसचिव, परीक्षा गोदाम कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. यांचे कार्यालयातून कार्यालयीन वेळेत व विद्यापीठ संकेत स्थळ **www.unipune.ac.in** येथे मिळू शकेल. तसेच सदर निविदा दि. १६ ऑक्टोबर, २०१४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने पाठविण्यात यावीत. उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

जाहिरात क्र. : **डॉ. नरेंद्र मा. कडू**

दिनांक : **कुलसचिव**

**दैनिक सकाळ, पुणे आवृत्ती**